रजिष्टर पोस्ट व्दारे

जाक्र.जिपवा/साप्रवि/आस्था-१/ ३२७८ /२०२१
कार्यालय,जिल्हापरिषद,वाशिम
दिनांक:- २२ /१०/२०२१

प्रति,

श्री/श्रीमती ------------------------------
- ------------------------------
- ------------------------------

विषय :- मुळ दस्ताऐवजासह उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ :- :- १) शासन निर्णय क्र. अकंपा १२१७/ प्र.क्र. १०२/ आठ दि.२१ ९/१७
२) शासन निर्णय क्र. अकंपा १२१९/ प्र.क्र. ५६/ आठ दि. १० जुन १९
३) शासन निर्णय क्र. अकंपा १२१९/ प्र.क्र. ५६/ आठ दि. दि. ११ सप्टेंबर १९
४)शासन शुध्दीपत्रक दिनांक ३० जुलै २०२० नुसार दिनांक ४ मे २०२०
५) या कार्यालयाचे आदेश क्र. जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/३१११/२१ दि.४/१०/२०२१
६) या कार्यालयाचे आदेश क्र. जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/३११२/२१ दि.४/१०/२०२१

उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणे करीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची सन २०२१ ची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शासन निर्णय ,शासन परीपत्रकानुसार मर्यादीत उमेदवारांना जिल्हा परिषदे अंतर्गत वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदावर नियुक्ती देणेबाबत तरतुदी आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.६ नुसार सर्व अनुकंपा धारक उमेदवारांना आदेशासोबत जोडलेल्या विवरणपत्र व नमुद केलेल्या कागदपत्रासह जिल्हा परिषद,वाशिम येथे दि.१२/१० ते १४/१०/२१ पर्यत मुळ कागदपत्रासह उपस्थित राहुन कागदपत्रे सादर करणे बाबत सुचीत करण्यात आले होते.

परंतु सदर दिनांकास आपण उपस्थित राहलेले नाही.करिता या पत्रान्वये आपणास पुन्हा सुचीत करण्यात येते की, www.zpwashim.in या वेबसाईटवर मुळ दस्ताऐवज सादर करावयाची यादी नुसार विवरणपत्र व नमुद केलेल्या कागदपत्रासह जिल्हा परिषद,वाशिम येथिल वसंतराव नाईक सभागृह जि.प.वाशिम येथे खालील नमुद केलेल्या दिनांकास सकाळी ११.०० वा. मुळ कागदपत्रासह उपस्थित राहुन कागदपत्रे सादर करावीत. सर्व मुळ कागदपत्राची झेरॉक्स प्रत कार्यालयास सादर करावी.

| अ.क्र. | जेष्ठता यादी सन २०२१ मधिल अ.क्र. नुसार उपस्थित राहवयाच्या उमेदवारांचा क्रम | उपस्थित रहावयाचा दिनांक | वेळ | उपस्थित रहावयाचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुकंपा जेष्ठता क्रम १ ते क्र. ७५ | दिनांक २८/१०/२१ | सकाळी ११.०० | वसंतराव नाईक सभागृह जि.प.वाशिम | |
| २ | अनुकंपा जेष्ठता क्रम ७६ ते क्र. १२४ | दिनांक २९/१०/२१ | सकाळी ११.०० | वसंतराव नाईक सभागृह जि.प.वाशिम | |

वरील प्रमाणे नमुद कागदपत्रे संबधित उमेदवाराकडुन प्राप्त न झाल्यास संबधितास अनुकंपा तत्वावर नौकरीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन अर्ज रद्द केल्या जाईल याची नोंद घ्यावी.तसेच सदर आदेश अनुकंपा मुळ दस्तऐवज पडताळणीच्या अनुषंगाने देण्यात येत असुन या आदेशाला नियुक्ती पत्र समजण्यात येवु नये याची नोंद घ्यावी. या पूर्वी नमुद दस्तऐवजापैकी काही मुळ दस्तऐवज सादर केले असल्यास

त्याची पोच सादर करणे बंधनकारक राहील तसेच जोडलेले विवरणपत्र दोन प्रतीत भरुन सादर करणे आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

प्रति,

१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.वाशिम यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम